दैनिक **हिंदू प्रकाशवार्ता**

epaper.hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

Web portal : hinduprakashwarta.com

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ११ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


### वरुणराजाचे आगमन आणि आव्हानांचे 72 तास

केरळमध्ये वेळेवर दाखल झाल्यानंतर मान्सूनने महाराष्ट्रातही दमदार हजेरी लावली आहे आणि आता त्याची पुढची वाटचाल वेगाने सुरू आहे. एकीकडे उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळलेल्या धरणीला शांत करण्यासाठी वरुणराजाचे हे आगमन सुखावह वाटत असले, तरी दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने जारी...

---> अग्रलेख - पान 2 वर

### शिर्डीत आरोग्याशी खेळ? विकला जातोय बुरशी लागलेला प्रसाद

**शिर्डी :** साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांची प्रसादाच्या नावाखाली सर्रास फसवणूक केली जातेय. मंदिर परिसरातील खासगी दुकानांमध्ये चक्क बुरशी लागलेले आणि कडक झालेले पेढे विकले जात असल्याचा आरोप भाविकांनी केलाय. त्यातच साम टिव्हीनं जेव्हा या खासगी विक्रेत्यांच्या दुकानावर भेट दिली तेव्हा धक्कादायक माहिती समोर आलीय. या पेढ्यांच्या बॉक्सवर ना एक्सपायरी डेट होती.ना हे पेढे नेमके कुठे बनवले याचा पत्ता..त्यामुळे श्रद्धेच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु असल्याचा प्रकार समोर आलाय.

# अग्निवीर जवानाकडून 3 वर्षे लैंगिक शोषण; लग्ना नकार, तरुणीची मुख्यमंत्र्यांकडे इच्छामरणाची मागणी

**बीड :** परळी तालुक्यातील एका धक्कादायक प्रकरणाने पुन्हा एकदा महिला सुरक्षेचा आणि न्यायव्यवस्थेतील विलंबाचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. विवाहाचे आश्वासन देत तीन वर्षे शारीरिक संबंध ठेवून ऐनवेळी लग्नास नकार दिल्याचा आरोप असलेल्या अग्निवीर जवानाविरोधात गुन्हा दाखल होऊनही अद्याप अटक न झाल्याने पीडित तरुणीने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे इच्छामरणाची परवानगी मागितली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धारूर तालुक्यातील सोनीमोहा येथील भरत तोंडे या अग्निवीर जवानाने विवाहाचे आश्वासन देत एका तरुणीसोबत दीर्घकाळ संबंध ठेवले होते. दोन्ही कुटुंबीयांच्या संमतीने विवाह निश्चित झाला होता. ६ मे रोजी विवाहसोहळा पार पडणार होता. लग्नासाठी पत्रिका वाटप, खरेदी आणि इतर सर्व तयारी पूर्ण झाली होती.

मात्र, विवाहाच्या काही दिवस आधीच भरत तोंडे याने लग्न करण्यास नकार दिल्याचा आरोप पीडित तरुणीने केला आहे. या घटनेनंतर तरुणीने परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तिच्या फिर्यादीवरून भरत तोंडेसह ११ जणांविरोधात लैंगिक अत्याचार, मानसिक छळ आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले.

विशेष म्हणजे, गुन्हा दाखल होऊन सुमारे एक महिना उलटूनही अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. आरोपी अग्निवीर जवान असल्याने त्याच्याविरोधात कारवाई करण्यास विलंब होत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या पीडित तरुणीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात आपली व्यथा मांडली आहे. "गुन्हा दाखल असूनही आरोपी मोकाट फिरत आहेत. न्याय मिळत नसल्याने माझा न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढासळत चालला आहे," असे तिने पत्रात नमूद केले आहे..

या प्रकरणामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून आरोपींना तातडीने अटक करून निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटना, महिला कार्यकर्त्या आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणात पोलिस प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते आणि पुढील तपासात कोणती माहिती समोर येते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## देशातील अनेक शहरांमध्ये आंदोलन होणार : दीपके

**मुंबई :** नीट पेपरफुटीवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला आणखी धार येणार आहे. हे आंदोलन देशव्यापी होणार असल्याची घोषणाही संस्थापक अभिजीत दीपके यानं केली आहे. या देशव्यापी आंदोलनाची सुरुवात पुण्यातून होत आहे. त्यानंतर लखनऊ, बेंगळुरूसह अनेक महत्वाच्या शहरांमध्ये हे आंदोलन होणार आहे, अशी माहिती दीपकेनं दिली.

नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभरात चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या कॉकरोच जनता पार्टीनं आता आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे. संस्थापक अभिजीत दीपके यानं यासंदर्भात घोषणा केलीय. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा देणार नसतील तर देशव्यापी आंदोलन सुरू करण्यात येईल. त्याची सुरुवात पुण्यापासून होत आहे. त्यानंतर लखनऊ, अमृतसर, बेंगळुरूसह अनेक शहरांमध्ये आंदोलन करण्यात येईल, असं दीपकेनं सांगितलं. अभिजीत दीपके यानं पुण्यात पत्रकार परिषद घेतली. ६ जून रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवरील आंदोलनाला विद्यार्थी, तरुणांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आता आंदोलनाची व्यापी वाढवणार असून, पुण्यात मोठे आंदोलन केले जाईल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात आंदोलन करण्यास परवानगी मिळाली आहे, अशी माहितीही दीपके यानं दिली.

**२० जूनला पुन्हा जंतर-मंतर :**

सरकारनं आमच्या मागण्यांची दखल घेतली नाही आणि धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला नाही तर, २० जून रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवर पुन्हा मोठं आंदोलन करण्यात येईल, असेही दीपकेने सांगितले. हा केवळ परीक्षेचा मुद्दा नाही, तर देशभरातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य आणि शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न आहे. त्यामुळेच आंदोलनाला व्यापक स्वरूप दिले जाणार आहे, असे दीपके म्हणाला.

# विमानसेवेत मोठी कपात; उद्योजक आणि पर्यटन क्षेत्रात चिंतेचे वातावरण

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राची पर्यटन राजधानी म्हणून जगभर ओळख असलेल्या छत्रपती संभाजीनगर शहराच्या हवाई कनेक्टिव्हिटीला एकामागून एक मोठे धक्के बसत आहेत. गोवा, सायंकाळची हैदराबाद विमानसेवा आणि दिल्लीची सकाळची विमानसेवा तात्पुरती बंद झाल्यानंतर आता नवी मुंबई आणि बंगळुरू मार्गावरील विमानसेवांमध्येही कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अवघ्या काही दिवसांत महत्त्वाच्या विमानसेवांना कात्री लावण्याच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील पर्यटन, उद्योग आणि व्यापार क्षेत्रातून प्रचंड नाराजी आणि चिंता व्यक्त केली जात आहे. विमान इंधनाचे वाढते दर आणि परिचालन खर्चाचा वाढता दबाव यामुळे विमान कंपन्यांनी हा तात्पुरता निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत असले, तरी याचा थेट फटका शहराच्या विकासाला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विमान कंपन्यांनी जाहीर केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार, इंडिगो एअरलाइन्सची नवी मुंबई मार्गावरील दररोजची विमानसेवा आता मर्यादित करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वीच सुरू झालेली ही रात्रीची सेवा आता आठवड्यातून केवळ चार दिवस धावणार आहे. बुधवार, शुक्रवार आणि सोमवारी ही सेवा उपलब्ध नसणार आहे, ज्यामुळे प्रवाशांना केवळ सकाळच्या मुंबई विमानाचा पर्याय उरला आहे. याशिवाय, सध्या आठवड्यातून चार दिवस उड्डाण घेणारी बंगळुरू विमानसेवा आता केवळ तीन दिवसांवर आणली गेली आहे. जुलै महिन्यापासून ही सेवा शनिवारी उपलब्ध नसेल. यापूर्वीच एअर इंडियाने दिल्लीची सकाळची विमानसेवा आणि इंडिगोने गोवा व हैदराबादची सायंकाळची सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे विमानतळावरील विमानांची संख्या कमालीची घटली आहे.

या विमान कपातीमुळे स्थानिक उद्योजक आणि पर्यटन संस्थांमध्ये तीव्र संताप पाहायला मिळत आहे. ट्रॅव्हल एजंट असोसिएशनचे प्रतिनिधी आणि नागरी विमान वाहतूक समितीच्या सदस्यांनी यावर नाराजी व्यक्त केली आहे. विमानसेवा अशा प्रकारे विस्कळीत झाल्यामुळे नवीन गुंतवणूकदार शहरात कसे येतील, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पर्यटन हंगाम आणि व्यावसायिक साखळी यामुळे पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त होत असून, स्थानिक हॉटेल व्यावसायिक, हस्तकला विक्रेते, पर्यटन मार्गदर्शक आणि वाहतूकदार यांच्या रोजगारावर याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. या गंभीर समस्येकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही आता केला जात आहे. हवाई प्रवास महाग आणि दुर्मिळ होत असल्याच्या काळात प्रवाशांना तूर्तास वंदे भारत एक्स्प्रेस आणि जनशताब्दी एक्स्प्रेस सारख्या रेल्वे पर्यायांचा अवलंब करावा लागणार असल्याचे चित्र आहे.

# पुरुषोत्तमपुरीत 50 भाविकांनी भरलेली बोट उलटली; दोन महिलेचा मृत्यू, अनेकांचा शोध सुरु

**माजलगाव :** बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या अधिकमास यात्रेदरम्यान गोदावरी नदीत भाविकांनी भरलेली बोट उलटल्याने बुधवारी दुपारी मोठी दुर्घटना घडली. या अपघातात एका महिलेचा पाण्यात बूडून दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक भाविक जखमी झाले आहेत. एका अल्पवयीन मुलाचा अद्याप शोध लागलेला नसून बचाव पथकांकडून शोधमोहीम सुरू आहे.

देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमासानिमित्त लाखो भाविक दर्शनासाठी दाखल झाले आहेत. यात्रेच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर मोठी गर्दी झाली होती. याच दरम्यान नदी पार करण्यासाठी निघालेली भाविकांनी भरलेली

-> पान 2 वर

### सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह

घटनेनंतर भाविक आणि स्थानिक नागरिकांनी यात्रेतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. बोटीतून प्रवास करणाऱ्या भाविकांना लाईफ जॅकेट देण्यात आले नव्हते, तसेच प्रवाशांची संख्या नियंत्रित करण्यासाठी प्रभावी यंत्रणा कार्यरत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### अल्पवयीन मुलाचा शोध सुरु

दुर्घटनेनंतर प्रशासनाने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आहे. मात्र, एका अल्पवयीन मुलाचा अद्याप शोध लागलेला नसून नदीपात्रात शोधमोहीम सुरू आहे. आपत्ती व्यवस्थापन पथक, पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी तळ ठोकून आहेत.

### दोन महिलांचा मृत्यू

या दुर्घटनेत कांताबाई ज्ञानदेव आंधळे ( वय ६८ वर्ष ,रा. कुंबेफळ,ता.सिंदखेड ),प्रणिला शेषेराव राठोड (वय ५५, रा. लोणार) यांचा मृत्यू झाला. तर सिंधूबाई अर्जुन मवाळ (वय ७५, रा. महागाव, जि. वाशिम) या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. इतर जखमी भाविकांवर माजलगाव येथील शासकीय तसेच खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

## 12 दिवसांच्या बाळाला ठेवून महिलेची कंकालेश्वर कुंडात उडी, मृत्यू

**बीड :** बीड शहरातील ऐतिहासिक कंकालेश्वर मंदिर परिसरात बुधवारी सकाळी एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली. १२ दिवसांच्या नवजात बाळाला घरी ठेवून एका महिलेने मंदिर परिसरातील कुंडात उडी घेतल्याने तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माधुरी आनंद सोळुंके (वय ३९) असे मृत महिलेचे नाव आहे. त्या मूळच्या पिंपळगाव कोलते येथील रहिवासी असून सध्या बीड शहरातील साई पार्क अपार्टमेंट येथे माहेरी मुक्कामी आल्या होत्या. बुधवारी सकाळी त्यांनी कंकालेश्वर मंदिर परिसरातील कुंडात उडी घेतल्याची माहिती समोर आली. घटनेची खबर मिळताच पेठ बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने महिलेचा मृतदेह कुंडातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. घटनेनंतर जिल्हा रुग्णालयात नातेवाईक आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. महिलेने हे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू असून सर्व बाजूंनी चौकशी केली जात आहे.

या घटनेने विशेषतः नवजात बाळाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात असून शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# रॉंग साईडचा हट्ट महागात; 166 चालकांना पोलिसांचा दणका

## विशेष मोहिमेत 6.64 लाखांचा दंड; बनावट नंबरप्लेट लावलेली कारही जाळ्यात

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीला आणि अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या रॉंग साईड वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी बुधवारी जोरदार मोहीम राबवत नियमभंग करणाऱ्यांना चांगलाच दणका दिला. शहरातील विविध चौकांमध्ये एकाच दिवशी १६६ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून ६ लाख ६४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.





पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या आदेशानुसार आणि पोलीस उपायुक्त (वाहतूक) शर्मिला घारगे-वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) सुभाष भुजंग यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक शाखेच्या पथकांनी शहरातील प्रमुख चौक आणि वर्दळीच्या मार्गांवर तपासणी नाके उभारून रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्यांवर लक्ष केंद्रित केले.

मोंढानाका, सिटी चौक, सेवनहिल, आकाशवाणी चौक, उस्मानपुरा टी-पॉईंट, हायकोर्ट सिग्नल, सेशन कोर्ट सिग्नल, बाराभाई ताजीया, रंगारगल्ली, मिलकॉर्नर चौक, नगरनाका, महावीर चौक,ओएसिस चौक आणि वाळूज गाव परिसरात सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना जागीच दंड आकारण्यात आला.

विशेष मोहिमेदरम्यान देवळाई चौक परिसरात एका डब्ल्यूआरव्ही कारची तपासणी करताना वाहतूक पोलिसांना संशयास्पद नंबरप्लेट आढळली. अधिक चौकशी केली असता संबंधित वाहनावर बनावट क्रमांक वापरण्यात आल्याचे उघड झाले. या प्रकरणी वाहनचालकाविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर वेळ वाचविण्याच्या प्रयत्नात काही वाहनचालक रॉंग साईडचा वापर करतात. मात्र यामुळे अपघातांचा धोका वाढण्याबरोबरच वाहतुकीची शिस्तही बिघडते. याच पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेने ही विशेष मोहीम हाती घेतली. भविष्यातही अशा कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार असून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका कायम राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# शासनाच्या नियमाप्रमाणे घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळवून देण्यासाठी गंगापूर तहसील कार्यालयात रवी चव्हाण यांची आक्रमक भूमिका

**दैनिक हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी**

**गंगापूर :** शासनाच्या नियमाप्रमाणे ठरवून दिलेली वाळू मिळवून देण्यासाठी गंगापूर तहसील कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्यासह तहसीलदारांना अनेक लाभार्थ्यासह कार्यालयात भेटून आक्रमक भूमिका घेऊन कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करा अशी मागणी गंगापूर पंचायत समितीचे सभापती

-> पान 2 वर



### अधिकाऱ्यांमधील समन्वय चव्हाट्यावर

गेल्या अनेक दिवसांपासून सतत संपर्कात असूनही नागरिकांच्या पदरी निराशाच पडत असल्याने, आता लोकप्रतिनिधी आणि भाजपा तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि नागरिक स्वतः मिळून ठरवून दिलेल्या ठिकाणांवरून घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप करतील, असा पवित्रा तिथे घेण्यात आला. महसूल विभागाच्या संथ कारभारामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगत, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. या वादामुळे गंगापूर तहसील कार्यालयातील अंतर्गत कारभार आणि अधिकाऱ्यांमधील समन्वय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# नाला स्वच्छ झाला; पण गुलमंडी दुर्गंधीच्या विळख्यात

## नाल्याचा गाळ रस्त्यावरच; रिक्षाचालक, व्यापारी आणि नागरिकांचा संताप

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**सिद्धेश्वर थोर**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या आणि नेहमीच वर्दळीच्या गुलमंडी परिसरात नाल्याची साफसफाई केल्यानंतर काढलेला गाळ आणि कचरा रस्त्याच्या कडेला टाकून ठेवण्यात आल्याने परिसर दुर्गंधीच्या विळख्यात सापडला आहे. या दुर्गंधीमुळे रिक्षाचालक, दुकानदार, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून



-> पान 2 वर

### "साफसफाई केली, पण गाळ उचलायचा विसरले का?"

नाल्याची साफसफाई करणे योग्यच आहे. मात्र काढलेला गाळ रस्त्यावरच टाकून ठेवल्याने दुर्गंधी पसरली आहे. रिक्षा स्टॅन्डवर येणाऱ्या प्रवाशांनाही त्रास होत आहे. साफसफाईनंतर लगेचच गाळ उचलला गेला पाहिजे होता.

- स्थानिक रिक्षाचालक

### "ग्राहकांसमोर दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे चित्र"

परिसरात चहा आणि खाद्यपदार्थांची अनेक दुकाने आहेत. दुर्गंधीमुळे ग्राहकांना अस्वस्थ वाटते. व्यापाऱ्यांनाही याचा फटका बसत आहे. प्रशासनाने तात्काळ कचरा हटवून परिसर स्वच्छ करावा.

- स्थानिक दुकानदार




# सं पा द की य

## वरुणराजाचे आगमन आणि आव्हानांचे 72 तास

केरळमध्ये वेळेवर दाखल झाल्यानंतर मान्सूनने महाराष्ट्रातही दमदार हजेरी लावली आहे आणि आता त्याची पुढची वाटचाल वेगाने सुरू आहे. एकीकडे उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळलेल्या धरणीला शांत करण्यासाठी वरुणराजाचे हे आगमन सुखावह वाटत असले, तरी दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने जारी केलेला ताजा इशारा चिंता वाढवणारा आहे. देशातील सतरा राज्यांसाठी पुढील ७२ तास अत्यंत महत्त्वाचे आणि संवेदनशील असणार आहेत. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली आर्द्रता आणि वादळी परिस्थिती यामुळे हवामानात वेगाने बदल होत असून, अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसासह ताशी ऐंशी किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हा इशारा केवळ एका पावसाच्या सरीचा नसून, निसर्गाच्या संभाव्य रौद्ररूपाची पूर्वकल्पना देणारा आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, बिहार, झारखंड, राजस्थान, दिल्ली, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असेल. काही ठिकाणी तर ढगफुटीसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याचा धोका आहे. बदलत्या हवामानाचा हा पॅटर्न पाहता, केवळ पाऊसच नाही तर वीज पडणे, गारपीट होणे आणि धुळीची वादळे येणे अशा विविध नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागू शकतो. मुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचणे, झाडे उन्मळून पडणे, वीज पुरवठा खंडित होणे आणि डोंगराळ भागात भूस्खलन होणे यासारख्या दुर्घटना घडू शकतात. अशा स्थितीत जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी केवळ नागरिकांनीच नव्हे, तर सर्व आपत्कालीन यंत्रणांनी पूर्णपणे सज्ज आणि सतर्क राहणे गरजेचे आहे. या बदलत्या ऋतूचा सर्वाधिक प्रभाव शेती क्षेत्रावर आणि ग्रामीण भागावर पडत असतो. हवामान खात्याने शेतीच्या कामांबाबत दिलेला सल्ला अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांनी पेरणी किंवा इतर कामे करताना विजांचा कडकडाट आणि वादळाचा अंदाज घेऊनच निर्णय घ्यायला हवा. देशांतर्गत वाहतूक, रेल्वे आणि विमान सेवेवरही या खराब हवामानाचा थेट परिणाम होऊ शकतो. हवामानाचा हा लहरीपणा जागतिक तापमान वाढीचा परिणाम असल्याचा इशारा पर्यावरण तज्ज्ञ वारंवार देत आले आहेत. पुढील काही दिवसांत वाऱ्याचा आणि पावसाचा जोर अधिक वाढणार असल्याने, नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे आणि या आव्हानात्मक काळात स्वतःची व कुटुंबाची काळजी घ्यावी, हेच या सद्यस्थितीत महत्त्वाचे आहे.

# बदाम, शेंगदाणा आणि चिंचोका गिळलेल्या तीन चिमुकल्यांना घाटीत जीवदान; पालकांना सावध राहण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर** : खेळता खेळता तोंडात गेलेला बदाम, शेंगदाणा आणि चिंचोका तीन चिमुकल्यांच्या जीवावर बेतला होता. मात्र घाटी रुग्णालयातील ईएनटी आणि बालरोग विभागाच्या तत्परतेमुळे अवघ्या तीन दिवसांत तिन्ही बालकांना नवजीवन मिळाले. वेळेवर करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया आणि उपचारांमुळे मोठा अनर्थ टळला असून, डॉक्टरांनी पालकांना लहान मुलांबाबत विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

दोन वर्षीय आयान सय्यद याने खेळताना बदाम गिळल्यामुळे त्याला खोकला, श्वास घेण्यास त्रास आणि आवाजात बदल जाणवू लागला. प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्याला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले. बालरोग विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे-मोरे यांनी तपासणीनंतर त्याला ईएनटी विभागाकडे पाठविले. विभागप्रमुख डॉ. सुनिल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ब्रॉन्कोस्कोपी करण्यात आली. या प्रक्रियेद्वारे श्वसनमार्गात अडकलेला बदाम यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आला आणि आयानची प्रकृती स्थिर झाली.

याच कालावधीत गायत्री बोराडे या चिमुरडीच्या फुफ्फुसात शेंगदाणा अडकल्याने तिची प्रकृती गंभीर झाली होती. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने तिला तातडीने घाटीत दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्वरित उपचार सुरू करत शस्त्रक्रियेच्या माध्यमातून शेंगदाणा बाहेर काढला. वेळेवर उपचार मिळाल्याने संभाव्य धोका टळला.

दरम्यान, आठ वर्षीय सई काकडे हिने चिंचोका गिळल्यामुळे तिच्या श्वसनमार्गात अडथळा निर्माण झाला होता. तिलाही तातडीने घाटी रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टरांनी आवश्यक तपासण्या करून शस्त्रक्रियेद्वारे चिंचोका बाहेर काढला. उपचारानंतर सईची प्रकृतीही सुधारली. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ईएनटी विभाग, बालरोग विभाग, भूलतज्ज्ञ आणि परिचारिका यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही यशस्वी कामगिरी पार पडली. तिन्ही बालकांवर मोफत उपचार करण्यात आले असून सध्या त्यांची प्रकृती चांगली असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

पालकांनी काय काळजी घ्यावी?

या घटनांच्या पार्श्वभूमीवर डॉक्टरांनी पालकांना विशेष सावध राहण्याचे आवाहन केले आहे. बदाम, शेंगदाणे, चिंचोके, नाणी, बटणे तसेच इतर लहान वस्तू मुलांच्या आवाक्याबाहेर ठेवाव्यात. लहान मुले खेळत असताना त्यांच्यावर लक्ष ठेवावे. एखादी वस्तू गिळल्याचा संशय आल्यास किंवा श्वास घेण्यास त्रास, सतत खोकला, आवाजात बदल यांसारखी लक्षणे दिसल्यास वेळ न दवडता तातडीने रुग्णालयात दाखल करावे, असे डॉक्टरांनी सांगितले. घाटी रुग्णालयातील डॉक्टरांच्या तत्परतेमुळे तीन कुटुंबांवरील संभाव्य दुःखाचा डोंगर टळला असून, या घटनांनी पालकांच्या सतर्कतेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

## घृष्णेश्वर विकास कामांना वेग देण्याचे आदेश, वेरूळ दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला प्रगतीचा आढावा

**छत्रपती संभाजीनगर** : जागतिक वारसा स्थळांच्या परिसरातील पायाभूत सुविधा आणि धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामांना अधिक गती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी संबंधित यंत्रणांना दिले. वेरूळ येथे विविध विकासकामांची पाहणी करताना त्यांनी प्रकल्पांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला आणि कामांच्या गुणवत्तेसह वेळेत पूर्णत्वावर भर दिला.

जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या वेरूळ दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या विविध स्थळांना भेटी दिल्या. मालोजीराजे भोसले यांच्या गढीची पाहणी करताना परिसरातील जतन आणि संवर्धनाच्या कामांबाबत माहिती घेतली. तसेच शहाजीराजे भोसले स्मारकाला भेट देऊन तेथील सुविधांचाही आढावा घेतला.

यानंतर घृष्णेश्वर मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. मंदिर परिसरात येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांसाठी उभारण्यात येणाऱ्या विविध सुविधांची माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्पाला अपेक्षित गती देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. वेरूळ भेटीदरम्यान जिल्हाधिकारी गौडा यांनी जनगणना पूर्वतयारीच्या कामाचाही आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती संकलन, नियोजन आणि अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचना करण्यात आल्या. यानंतर तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांशी संवाद साधत स्थानिक समस्या, विकासकामे आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या. ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर संबंधित विभागांना तत्काळ लक्ष देण्याच्या सूचना देतानाच विकास प्रक्रियेत लोकसहभागाचे महत्त्वही जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले. धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्व असलेल्या वेरूळ परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या पाहणी दौऱ्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी बुधवारी रात्री वेरूळ येथे मुक्काम करून स्थानिक प्रशासनाच्या कामकाजाचाही आढावा घेतला.

## पुरुषोत्तमपुरीत 50 भाविकांनी भरलेली बोट उलटली...

पान 1 वरून ->

बोट मध्यप्रवाहात असताना अचानक असंतुलित होऊन उलटली.

बोटीत ४० ते ५० भाविक

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, बोटीत सुमारे ४० ते ५० भाविक प्रवास करत होते. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवण्यात आल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप भाविकांकडून करण्यात येत आहे. बोट उलटताच सर्व प्रवासी नदीत पडल्याने काही काळ भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

अनेक भाविकांनी स्वतः पोहून किनारा गाठला, तर स्थानिक नागरिक, स्वयंसेवक, मच्छीमार आणि प्रशासनाच्या पथकांनी तत्काळ मदतकार्य हाती घेत अनेकांना सुरक्षित बाहेर काढले.

यात्रेसाठी दरवर्षी लाखो भाविक येत असताना बोट वाहतुकीसाठी पुरेशा सुरक्षाव्यवस्था का करण्यात आल्या नाहीत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटींमुळे ही दुर्घटना घडल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

चौकशी आणि कारवाईची मागणी

दुर्घटनेनंतर भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

## सोयगावमधील उर्दू आणि मराठी हायस्कूलच्या बांधकामाबाबत माहिती देण्यास नगरपंचायतीची टाळाटाळ; माहिती मिळेना

शेख हक्कानी

**सोयगाव** : शहरातील प्रगती उर्दू हायस्कूल आणि नॅशनल मराठी हायस्कूलच्या भव्य इमारत व व्यापारी संकुल बांधकामाबाबतची अधिकृत माहिती मिळवण्यासाठी एका नागरिकाने दाखल केलेला माहिती अधिकाराचा अर्ज नगरपंचायत प्रशासनाच्या भूमिकेमुळे चर्चेत आला आहे. सदर बांधकामाच्या कायदेशीर बाबी, कर आकारणी आणि तपासणी अहवालाबाबत माहिती मागवूनही प्रशासनाने ती उपलब्ध नसल्याचे नमूद केल्याने तक्रारदाराने आता प्रथम अपील दाखल केले आहे.

नेमके प्रकरण काय?

सोयगाव येथील रहिवासी महेश शंकरलाल शंकरपेल्ली यांनी प्रगती उर्दू हायस्कूल आणि नॅशनल मराठी हायस्कूलच्या इमारत बांधकामाबाबत माहिती अधिकारांतर्गत अर्ज केला होता. या अर्जात त्यांनी बांधकामाशी संबंधित मालमत्ता धारकांना मिळालेल्या नोटीस, नगरपंचायतीने केलेली पाहणी, चौकशी अहवाल, भोगवटा प्रमाणपत्र, इमारत पूर्णत्व प्रमाणपत्र आणि या बांधकामावर केलेली कर आकारणी (नमुना नंबर ४३) याची सविस्तर माहिती मागितली होती.

प्रशासनाचे उत्तर आणि अपीलाचा मार्ग

सुरुवातीला माहिती अधिकारांतर्गत अर्ज केल्यानंतर, जनमाहिती अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयातील अभिलेख तपासले असता संबंधित इमारत व व्यापारी संकुलाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे लेखी कळवले. या उत्तरामुळे असमाधानी असलेल्या तक्रारदाराने माहिती अधिकाराच्या नियमांनुसार प्रथम अपील दाखल केले. माहिती लपवून ठेवणे हे भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्यासारखे असल्याचा गंभीर आरोप करत, तक्रारदाराने या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि नियमानुसार माहिती तत्काळ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

२७ जून रोजी सुनावणी

**या प्रकरणाची दखल घेत प्रथम अपील प्राधिकरणाने तक्रारदाराला सुनावणीसाठी बोलावले आहे. ही सुनावणी २७ जून २०२३ रोजी दुपारी २:**३० वाजता सोयगाव नगरपंचायतीच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या दालनात पार पडणार आहे. आता या सुनावणीत प्रशासन बांधकामाबाबत काय भूमिका घेते आणि तक्रारदाराला अपेक्षित माहिती मिळते का, याकडे सोयगावकर नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**संदर्भ:** माहिती अधिकार अर्ज (दिनांक ०३/०३/२०२३)

जनमाहिती अधिकाऱ्यांचे उत्तर (दिनांक १८/०४/२०२३)

प्रथम अपील अर्ज (दिनांक ०२/०५/२०२३)

सुनावणीची नोटीस (दिनांक २०/०६/२०२३)

## शासनाच्या नियमाप्रमाणे घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळवून देण्यासाठी...

पान 1 वरून ->

कविता चव्हाण यांचे पती भारतीय जनता पार्टीचे गंगापूर तालुका अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तहसीलदारांकडे केली. गंगापूर पंचायत समिती मार्फत मंजूर झालेल्या घरकुलाची यादी महसूल प्रशासनाकडे देऊन हेतू पुरस्कर टोलवाटोलवी करून गोरगरीब जनतेला मिळणारी वाळू न मिळाल्यामुळे तहसील महसूल विभागाचा बोगस कारभार लाभार्थ्यांना सोबत घेऊन अखेर जनतेसमोर आणला.

गंगापूर भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष तथा गंगापूर पंचायत समितीच्या कविताताई चव्हाण यांच्या पतीचा रुद्र अवतार पाहून तहसील प्रशासनाची धावपळ उडाली व गंगापूर तहसील कार्यालय पुन्हा चर्चेत आले आहे.

गंगापूर येथील तहसील कार्यालयात पुन्हा एकदा मोठा गदारोळ झाल्याचे समोर आले आहे. पंचायत समितीच्या सभापतींच्या पतीने थेट तहसील कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरल्याचा एक व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर जोरदार व्हायरल होत आहे. घरकुल लाभार्थ्यांच्या हक्काच्या वाळूच्या मुद्द्यावरून हा सर्व प्रकार घडल्याचे सांगण्यात येत असून, यामुळे प्रशासकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना वाळू मिळण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून पाठपुरावा सुरू होता. गंगापूर पंचायत समिती मार्फत मंजूर लाभार्थ्यांची यादी तहसील प्रशासनाकडे सादर करूनही त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ऑनलाइन संकेतस्थळ बंद झाल्याचे कारण पुढे केल्याने संतप्त झालेल्या भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष रवी चव्हाण यांनी थेट तहसीलदारांच्या दालनात प्रवेश केला आणि अधिकाऱ्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली.

सदर व्हिडिओमध्ये, प्रशासकीय कामात बाहेरील व्यक्तींचा हस्तक्षेप होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. कार्यालयातील संगणक ऑपरेटर आणि इतर खासगी व्यक्ती शासकीय कामात का लुडबुड करत आहेत, असा सवाल उपस्थित करत संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याची मागणी तिथे करण्यात आली. सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडलेली असताना वाळू माफियांचे कामे मात्र विनाअडथळा सुरू असल्याचा संताप यावेळी व्यक्त करण्यात आला.

## जिल्हाधिकाऱ्यांची पिंपरी गावात भेट; शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची केली विचारपूस



**छत्रपती संभाजीनगर, दि.१०(जिमाका) :** जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी आज पिंपरी ता. कन्नड या गावास भेट दिली. येथे त्यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबियांची भेट घेतली व जनगणना कार्याची पडताळणी केली.

त्यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी एम, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन तसेंच अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

शेतकरी आत्महत्यग्रस्त कुटुंबाची भेट

जिल्हाधिकारी गौडा यांनी पिंपरी या गावातील विष्णू काशिनाथ जोगदंड या दिवंगत शेतकऱ्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. या कुटुंबाला विविध शासकीय योजनांचे देण्यात आलेले लाभ, त्यांची सद्यस्थिती याबाबत आस्थेवाईकपणे विचारपूस केली. तसेच आगामी हंगामासाठी बियाणे थैली दिली.

जनगणना पडताळणी

याच गावात झालेल्या जनगणना कार्याची पडताळणी ही जिल्हाधिकारी गौडा यांनी केली. बाबुलाल भाऊलाल कुदळे यांच्या कुटुंबाची गणना झाल्याची खात्री त्यांनी मोबाईल ॲपवर करून खात्री केली.

## प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना अंतिम मुदतीपूर्वी रक्कम भरण्याचे आवाहन




**छत्रपती संभाजीनगर** : महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या सदनिकांच्या वाटप प्रक्रियेत निवड झालेल्या लाभार्थ्यांना सदनिकेच्या एकूण किंमतीपैकी १० टक्के रक्कम भरण्यासाठी अंतिम संधी देण्यात आली आहे.या बाबत मा.आयुक्त श्री अमोल येडगे यांनी काल दि.०८ जून रोजी त्यांचे दालनात आढावा बैठक घेतली होती.

महानगरपालिकेतर्फे यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना (AHP) अंतर्गत विविध प्रकल्पांतील एकूण ११,१२० सदनिकांच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. स्वतःचे पक्के घर नसलेले तसेच वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या पात्र अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

सुंदरवाडी, पडेगाव, हर्सूल आणि तिसगाव येथील गृहप्रकल्पांमधील पात्र लाभार्थ्यांची निवड ३० मार्च २०२६ रोजी सोडत प्रक्रियेद्वारे करण्यात आली. निवड झालेल्या लाभार्थ्यांना सदनिकेच्या एकूण किंमतीपैकी १० टक्के रक्कम भरण्याबाबत टपालाद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. या रकमेच्या भरण्यासाठी ६ जून २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तथापि, अनेक लाभार्थ्यांकडून अद्यापही १० टक्के रक्कम जमा करण्यात आलेली नसल्याने महानगरपालिकेने अंतिम मुदत १८ जून २०२६ पर्यंत वाढविली आहे. या कालावधीत संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक रक्कम जमा करणे बंधनकारक असून, मुदतीत रक्कम न भरल्यास त्यांना वाटप करण्यात आलेल्या सदनिकेवरील हक्क रद्द करण्यात येणार आहेत.

तसेच, रद्द झालेल्या सदनिकांचे वाटप प्रतीक्षा यादीतील अथवा इतर पात्र अर्जदारांना करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी अंतिम मुदतीची नोंद घेऊन तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नाला स्वच्छ झाला; पण गुलमंडी दुर्गंधीच्या विळख्यात...

पान 1 वरून ->

संबंधित विभागाने तातडीने हा कचरा उचलावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

गुलमंडी हा शहरातील प्रमुख व्यापारी परिसर मानला जातो. येथे कपडे, किराणा, खाद्यपदार्थ, चहाचे स्टॉल तसेच विविध व्यावसायिक आस्थापने मोठ्या प्रमाणात आहेत. याच ठिकाणी रिक्षा स्टॅन्ड असल्याने दिवसभर नागरिकांची आणि प्रवाशांची मोठी गर्दी असते. काही दिवसांपूर्वी नाल्याची साफसफाई करण्यात आली. मात्र साफसफाईदरम्यान काढण्यात आलेला गाळ आणि कचरा जागेवरच टाकून देण्यात आल्याने समस्या निर्माण झाली आहे.

सध्या या गाळातून तीव्र दुर्गंधी पसरत असून परिसरातील व्यावसायिकांनाही त्याचा फटका बसत आहे. रिक्षा स्टॅन्डच्या अगदी शेजारीच कचऱ्याचा ढीग असल्याने प्रवाशांना उभे राहणेही कठीण होत आहे. अनेक प्रवासी दुर्गंधीमुळे रिक्षामध्ये बसण्यास टाळाटाळ करीत असल्याचे रिक्षाचालकांनी सांगितले.

स्थानिकांच्या मते, नाल्याची साफसफाई करणे आवश्यक आहेच; मात्र काढलेला गाळ आणि कचरा तातडीने उचलणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कचरा अनेक तास अथवा दिवस पडून राहिल्यास दुर्गंधीसोबतच आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

परिसरात खाद्यपदार्थ विक्रीची अनेक दुकाने असल्याने दुर्गंधीचा परिणाम ग्राहकांवरही होत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, अशा अस्वच्छ वातावरणामुळे व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने कचरा हटवून परिसर स्वच्छ करावा.

## घाटीत क्लब फूट बाधित 25 मुलांना बूट वाटप व मार्गदर्शन

### अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग आणि क्यूअर इंडियाचा संयुक्त उपक्रम



छत्रपती संभाजीनगर, दि. 10 (प्रतिनिधी)- जागतिक क्लब फूट दिनाच्या निमित्ताने घाटीतील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग आणि क्यूअर इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने क्लब फूट (जन्मजात वाकडे पाय) बाधित मुलांना बूटवाटप व त्यांच्या पालकांसाठी मार्गदर्शन शिबीर बजाज संकुल येथे आयोजित केले होते. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आला. कार्यक्रमास उपाधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी सर्व पालकांचे स्वागत करत, आपल्या पाल्याचे उपचार घाटीत करण्याचे आवाहन केले. अनेकदा ग्रामीण भागातील पालक मोठा खर्च आणि भीती यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेत नाही. त्यामुळे तो पाल्य आजारावर मात करू शकत नाही. मात्र आता नवनवीन यंत्रणा आणि सुविधा यामुळे प्रत्येकाला न्याय मिळतो. जास्तीत लोकांनी या सेवेचा फायदा घेण्याचे आवाहन डॉ. सुक्रे यांनी केले.

अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम.बी.लिंगायत यांनी सांगितले की, दरवर्षी घाटीतील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग आणि क्यूअर इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येतो. क्युअर इंडियाच्या माध्यमातून मिळणाऱ्या साहित्याचा मुलांना चांगला फायदा होतो. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या माध्यमातून घाटीत अनेक सुविधा उपलब्ध होत आहे. त्यांचा थेट फायदा रुग्णांना होत आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या परिसरात जनजागृती करावी, असे आवाहन डॉ. लिंगायत यांनी केले. कार्यक्रमादरम्यान क्बल फूट आजार झालेल्या २५ मुलांना मोफत बूट वाटप करण्यात आले. तर इतर २५ मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या. या वर्षभरात घाटीतील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाकडून क्लब फूट आजार झालेल्या २८६ मुलांवर मोफत उपचार करण्यात आले आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# मराठवाड्यात युवा वक्त्यांची चमक; युवासेनेची 'सडेतोड वकृत्व स्पर्धा' यशस्वी

**छत्रपती संभाजीनगर :** युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त युवासेनेच्या वतीने आयोजित विभागस्तरीय “सडेतोड वकृत्व स्पर्धा – 2026 उत्साहपूर्ण वातावरणात शिवाई ट्रस्ट, शिवसेना भवन, संभाजीपेठ, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाली. मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या युवक-युवतींनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

“माझा महाराष्ट्र, माझी जबाबदारी” तसेच “21 व्या शतकातील मराठी अस्मिता - आव्हाने आणि संधी” या विषयांवर स्पर्धकांनी अभ्यासपूर्ण, परखड आणि प्रभावी मते मांडली. स्पर्धेत एकूण 35 वक्त्यांनी सहभाग घेतला. युवकांच्या वक्तृत्वकौशल्याला व विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेतील निकालानुसार स्वप्नील सोपान खरात (ता. मंठा,



जि. जालना) यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर वेदिका सूर्यकांत पाथरकर (छत्रपती संभाजीनगर) यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेत हे दोन जन सहभाग घेतील.

स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून तुषार अहिरे व प्रसंजित तायडे यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. स्पर्धेचे नियोजन आणि आयोजन युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

स्पर्धेच्या माध्यमातून मराठवाड्यातील युवक-युवतींना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली असून, अशा उपक्रमांमुळे सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विषयांबाबत युवकांमध्ये जागरूकता निर्माण होणार आहे.

स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणारे स्वप्नील सोपान खरात यांनी “माझा महाराष्ट्र, माझी जबाबदारी” या विषयावर प्रभावी भाषण करत महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत सक्रिय भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली.द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या वेदिका सूर्यकांत पाथरकर यांनी 21 व्या शतकातील मराठी अस्मिता - आव्हाने आणि संधी” या विषयावर परखड भूमिका मांडली. जागतिकीकरण, तंत्रज्ञान आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरा जपण्याची आवश्यकता त्यांनी विशद केली.

याप्रसंगी शिवसेना उपनेते सुभाष पाटील, उपजिल्हाप्रमुख संतोष खेंडके, राजू इंगळे,शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, दिग्विजय शेरखाने,विधानसभा संघटक गोपाल कुलकर्णी, सचिन खैरे,ऋषी खैरे,हनुमान शिंदे, विठ्ठल डमाळे पाटील,अभिजीत थोरात,अजय चोपडे,स्वप्नील डिडोरे,रामेश्वर कोरडे, विकास गोर्डे,मधुर चव्हाण, हरीष पाटील, साईनाथ थोरात, देविदास खरात, शिवा आहेर, प्रसाद पानपट, संभाजी सोनवणे, लखन ठाकूर, विजय वाडेकर, उदयराज दानवे, राघव दानवे व युवतीसेना उपजिल्हा संघटक कोमल पांढरे उपस्थित होते.

# बहुलीत राज्य पुष्प जारुळ उमलले : पुष्प जन्माचे पाळणा हलवून स्वागत

**हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी**

**अजिंठा :** जारुळ -ताम्हण हा वृक्ष महाराष्ट्र राज्याचा राज्य पुष्प व हरित मानचिन्ह आहे. त्यास "प्राइड ऑफ इंडिया" म्हणजे भारताचा गौरव असेही म्हटले जाते. जुलै महिन्यामध्ये सिल्लोड तालुक्यातील बहुली येथे शासकीय जमिनीवर चार हजार वृक्षांचा जैवविविधता प्रकल्प गावकरी , सामाजिक वन विभाग व डॉक्टर पाटील यांनी उभारला. संपूर्ण गावाने या प्रकल्पास तार कंपाऊंड ठिबक सिंचन करून सर्व झाड वाढीस लावली. या प्रकल्पात तालुक्यास अपरिचित असलेली जारुळ -ताम्हण या राज्यपुष्प वृक्षाची अनेक रोप लावण्यात आले. त्यातील एका आठ फूट उंचीच्या जारुळास अकरा दिवसांपूर्वी कळ्या उमलण्यास सुरुवात झाली व





आज बारावा दिवस असून या पुष्पजन्माचं पाळणा हलवून स्वागत करण्यात आलं . मिठाई वाटण्यात आली . तालुक्यात हा वृक्ष पहिल्यांदाच उमलला आहे, हा वृक्ष आपल्या जिल्ह्यातील जंगलात कुठे ही वन्य अवस्थेत नसून त्याची लागवड जिल्ह्यात मोजक्या ठिकाणी आहे.

मानवी जन्मा इतकच झाड ही तितकचं महत्त्वाचे आहे व त्याचे संगोपन मानवा इतकेच मौलिक आहे हा संदेश यातून गावाने राज्याला दिला आहे. गावातील महिला भगिनींनी पाळणा सजवत त्यात एक त्यात राज्य पुष्प ठेवून पाळणा हलवून वृक्ष महतीचे पाळणा गीत महिलांनी म्हटले .झाडाचं औक्षण व सेंद्रिय खताने ओटीही भरण्यात आली प्रत्येक महिलेने थोडं थोडं जैविक सेंद्रिय खत झाडालगतच्या मातीत मिसळून औक्षण केलं.

बारसे करून नाव ठेवले "अमृता" हे नामकरण ही या फुलाचे नामकरन केले. राजस्थान मध्ये १७ व्या शतकात अमृता देवी बिष्णोई, त्यांचे कुटुंब व पूर्ण गाव असे ३६७ लोकांनी खेजडीचे झाडे वाचवण्यासाठी झाडांना अलिंगन देऊन बलिदान दिले होते.त्यांच्या बलिदानाचे स्मरण म्हणून पाळण्यातील या फुलंराणी चे नामकरण "अमृता" असे करण्यात आले. या मानव निर्मित वनास 'अमृतवन 'असे नामकरण ही गावाच्या एकजुट सहमतीने केले.

**शिक्षकांना आवाहन करतो कि" एकच लक्ष... प्रत्येक शाळेत राज्यपुष्प वृक्ष हा उपक्रम राबवावा .आम्ही मदत करू.जैवविविधता संवर्धन हेतू रोपण व्हावे. या वृक्षाचा राज्यभर प्रसार व्हावा. हा वृक्ष सेंटार ओक व लार्ज ओक ब्ल्यू या प्रजातीच्या फुलपाखरांचा "होस्ट प्लांट "आहे व फुलं ही मधमाशा, कीटक यांना आकर्षित करतात.**

**- डॉ. संतोष पाटील**

# जीवन जगण्याची कला मनुष्यास अवगत होणे महत्त्वाचे - डॉ.रामेश्वर नाईक

**हिंदू प्रकाश वार्ता, प्रतिनिधी**

**परभणी :** शिक्षणाचा संबंध वर्तनाशी आसतो आणि वर्तनाचा संबंध परिवर्तनाशी असतो शिक्षणामुळे मनुष्याच्या वर्तनात बदल घडायला हवा जीवन जगण्याच्या चला मनुष्यास अवगत होणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन परभणी भूषण डॉक्टर रामेश्वर नाईक यांनी काय अनंत कमलाकर कातनेश्वरकर स्मरणार्थ आयोजित गुणगौरव सोहळ्यात केले . येथील ऑडिट नगर व विश्वास नगरात मागील 25 वर्षापासून हे अनंत कमलाकर राव कातमेश्वर कर यांच्या स्मरणार्थ गुणवंत चा गुणगौरव व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येत असतो या सोहळ्याच्या



अध्यक्षस्थानी गटनेते विजय जामकर हे उपस्थित होते. दहावी व बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला तसेच परभणी भूषण डॉक्टर रामेश्वर नाईक यांना ज्ञान विज्ञान सेवाभाव हा पुरस्कार प्रदान करण्यात आला नगरातील नागरिकांनी सन्मानपत्र देऊन कृतज्ञता व्यक्त केली एडवोकेट रवींद्र कमलाकर कातनेश्वर कर यांनी केले होते यावेळी सन्मान पत्राचे वाचन करण्यात आले तसेच मागील 24 वर्षापासून या कार्यक्रमात ज्याचे मोलाचे योगदान आहे असे नगरातील समाजसेवक मोविन भाई गाजी आहे यांच्या स्मरण पत्राचे वाचन करण्यात आले त्या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून अर्जुन सामाले निवृत्त मुख्याध्यापक आनंद देशमुख उपस्थित होते मुख्याध्यापक आनंद देशमुख यांनी संघ स्वयंसेवक कैलासवासी अनंत कमलाकर कातनेश्वर कर यांच्या स्मृतीस उजाळा दिला.

# परभणी हिंगोली स्थानिक निवडणुकी संदर्भात उमेदवार व प्रतिनिधी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न

**परभणी :** महाराष्ट्र विधान परिषदेचे परभणी हिंगोली स्थानिक प्राधिकार मतदार संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजय सिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली या बैठकीत उमेदवाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शक शांततापूर्ण व नियम बुद्ध पद्धतीने पार पाडावे यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आचारसंहितेचे काटेकोर करणे पालन करणे प्रचारादरम्यान संयम राखणे मतदान प्रक्रिया सहकार्य करणे तसेच निवडणुकीसी विविध नियम व तरतुदीचे



पालन करण्याबाबत सूचना दिल्या.

तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनुराधा ढालकरी यांनी उमेदवार व प्रतिनिधींना निवडणुकीतील शासकीय बाबी आवश्यक कागदपत्रे मतदान केंद्रावरील व्यवस्था तसेच निवडणूक प्रक्रिया दरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी मतदान प्रक्रिया संदर्भात तांत्रिक बाबी निवडणूक साहित्याचा वापर तसेच निवडणूक आयोगाच्या सूचनाचे पालन करण्याबाबत उमेदवारांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या निवडणूक प्रक्रिया सुरळीत पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पडणार यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले यावेळी उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रुग्णाला TAVI द्वारे जीवनदान

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये गुंतागुंतीची हृदयशस्त्रक्रिया यशस्वी

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** मेडिकव्हर हॉस्पिटल येथे ७१ वर्षांचे, अवघे ४१ किलो वजन असलेल्या रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीची ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व इम्प्लांटेशन (TAVI) शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या रुग्णाला जुना इंटरस्टिशियल लंग डिसीज (ILD) आणि गंभीर एओर्टिक स्टेनोसिस (Severe Aortic Ste- nosis) असल्यामुळे मागील चार वर्षांपासून योग्य उपचाराची प्रतीक्षा करावी लागत होती.

रुग्णाच्या महाधमनी (आओर्टा) व फेमोरल आर्टरीमध्ये मोठ्या




प्रमाणात कॅल्शियम साचलेले होते. तसेच पायातील धमनीचा आकार लहान असल्यामुळे पारंपरिक ओपन हार्ट शस्त्रक्रिया शक्य नव्हती आणि ती नाकारण्यात आली होती. त्यामुळे अत्याधुनिक आणि कमी आक्रमक अशा TAVI प्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला.

शस्त्रक्रियेपूर्वी सर्वात मोठे आव्हान म्हणजे पायातील कॅल्सिफाइड धमनीतून व्हॉल्वपर्यंत सुरक्षित मार्ग तयार करणे होते. यासाठी प्रथम इन्ट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी (IVL) या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून धमनीतील कॅल्शियम फोडण्यात आले आणि रक्तवाहिनी विस्तारित करण्यात आली. त्यानंतर व्हॉल्व सुरक्षितरीत्या हृदयापर्यंत पोहोचवून यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले.

ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक असली तरी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ती यशस्वीरित्या पार पडली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर असून त्याची पोस्ट-प्रोसीजर स्थिती समाधानकारक आहे. ही जटिल शस्त्रक्रिया हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सुमित शेजोळ आणि डॉ. मनीष पुराणिक यांनी यशस्वीरित्या पार पाडली. मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी या प्रगत वैद्यकीय सुविधांची मराठवाडा आणि विदर्भात प्रथमच उपलब्धता झाल्याबद्दल संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. तसेच या यशामध्ये डॉ. कुलदीप तोटावर आणि डॉ. देवेन देशपांडे यांचेही मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी सांगितले.

# मोफत नेत्रतपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (एलिट) व आरटीओच्या संयुक्त उपक्रमातून 75 नागरिकांची तपासणी

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** कै. डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ‘नेत्रदान दिना’निमित्त रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (एलिट) आणि आरटीओ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने रेल्वे स्टेशन रोड येथील आरटीओ परिसरात मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नेत्रसेवा आणि नेत्रदान जनजागृती क्षेत्रात मोलाचे योगदान



देणारे कै. डॉ. रामचंद्र भालचंद्र यांनी आपल्या आयुष्यात ८० हजारांहून अधिक नेत्रशस्त्रक्रिया करून हजारो अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश आणला होता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी १० जून हा दिवस ‘दृष्टीदान दिवस’ म्हणून साजरा केला जातो.

शिबिराचे उद्घाटन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा माधुरी सांगवीकर, सतीश जोशी, श्री. नाईक, रोटेरियन अंजली भालचंद्र व श्री. कानडे यांच्या हस्ते कै. डॉ. भालचंद्र यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करून करण्यात आले. उद्घाटनानंतर विजय काठोळे यांनी स्वतः नेत्रतपासणी करून शिबिरास प्रारंभ केला.

लायन्स आय हॉस्पिटल, चिकलठाणा येथील तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या पथकाने नेत्रतपासणी केली. शिबिरात एकूण ७५ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थींना मोफत चष्म्यांचेही वाटप करण्यात आले.

यावेळी कै. डॉ. भालचंद्र यांच्या परिवारातील रोटेरियन अंजली भालचंद्र, जयश्री देशपांडे व डॉ. रत्नाकर देशपांडे उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक आरटीओ मोनाल शेट्टी व निखिल यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी विजय काठोळे यांनी रस्ता सुरक्षेबाबत जनजागृतीची गरज अधोरेखित करत हा विषय शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची सूचना केली. उपस्थितांनी उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे अभिनंदन केले.

# आदिक मासानिमित्त तहसीलदारांचा अंजनाई गोशाळेत गोपूजन व वृक्षारोपण

**हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी**

**सोयगाव,दि.१० जून :** आदिक मासानिमित्त तहसीलदार मनिषा मेने-जोगदंड यांनी आमखेडा येथील क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था संचालित अंजनाई गोशाळेला बुधवारी (दि. १०) सायंकाळी भेट देऊन गोमातेचे पूजन केले. यावेळी त्यांनी गोमातांना फळांचा आहार खाऊ घालत गोसेवेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

गोशाळा परिसरात तहसीलदार मेने-जोगदंड यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच संस्थेच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.संस्थेच्या




कोषाध्यक्षा उर्मिला इंगळे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

यावेळी नायब तहसीलदार संभाजीराव देशमुख, क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे, उपाध्यक्ष ईश्वर इंगळे,सचिव दिलीप शिंदे,सहसचिव अनिल लोखंडे, कोषाध्यक्ष उर्मिला इंगळे, सदस्या पद्माबाई शिंदे, रुपाली लोखंडे, शारदा इंगळे, मीना गाडेकर तसेच सदस्य ज्ञानेश्वर गाडेकर, राम बोडखे, ज्ञानेश्वर जाधव, राहुल जयवळ, योगेश चौधरी, केतन शिंदे, अथर्व इंगळे, गौरव हिरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे उपाध्यक्ष ईश्वर इंगळे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना



**सावळदबारा प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ सेवा करणारे निवडून आलेले पंतप्रधान होण्याचा गौरव प्राप्त केल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या हस्ते सावळदबारा येथील महादेव मंदिर येथे पूजा करून महाआरती करण्यात आली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली.सावळदबारा येथील महादेव मंदिर येथे महाआरती करण्यात आली यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, ताराचंद जाधव, जगनराव वरखड, राजू दांडगे, रामचंद्र चिमणकर, समाधान सपकाळ, भास्कर तायडे, सुधाकर साळुंके, रमेश खराटे, सखाराम कोते, संदीप बोबडे,प्रभू सूर्यवंशी, प्रकाश देशमुख,नरेश देशमुख,मुकेश रावळकर, मयुर महाजन,नागरिक उपस्थित होते.

# एमजीएममध्ये 17 व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन

## जगभरातील विविध देशांतील मान्यवरांचा सहभाग; माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते उद्घाटन

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन शुक्रवार, दि.१२ जून २०२६ आणि शनिवार, दि.१३ जून २०२६ रोजी एमजीएम विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे. “शैक्षणिक परिवर्तनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर . विविध विद्याशाखांचा समन्वय” या संकल्पनेवर आधारित ही दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली असून शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि संशोधन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि धोरणकर्ते यांचा यात सहभाग राहणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दिनांक



१२ जून २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता रुक्मिणी सभागृह येथे ऋषिहूड युनिव्हर्सिटीचे कुलपती तथा माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय ग्राम विकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे, एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. तर समारोप समारंभ शनिवार, दिनांक १३ जून २०२६ रोजी दुपारी ३ वाजता रुक्मिणी सभागृह येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सहसचिव संतोष अजमेरा, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, नॉर्थ बेंगळुरू युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा.डॉ.बी.के.रवी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

ही परिषद एमजीएम विद्यापीठ, महाराष्ट्र, भारत; ब्रिजवॉटर स्टेट युनिव्हर्सिटी (बीएसयू), मॅसेच्युसेट्स, अमेरिका; हसन द्वितीय विद्यापीठ, कॅसाब्लांका, मोरोक्को; सिदी मोहम्मद बेन अब्देल्लाह विद्यापीठ (एसएमबीएयू), फेस, मोरोक्को आणि तफिला टेक्निकल युनिव्हर्सिटी (टीटीयू), तफिला, जॉर्डन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवोपक्रम, आंतरविद्याशाखीय संशोधन, शाश्वत विकास आणि जागतिक स्तरावरील शैक्षणिक परिवर्तन या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला आणि वैद्यकशास्त्र (स्टिम) या संकल्पनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि मानवकेंद्रित शिक्षणव्यवस्था विकसित करण्याचा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या परिषदेत विविध विषयांवर आधारित नऊ प्रमुख संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन आणि अध्ययन पद्धती, शिक्षणातील समानता, विविधता आणि समावेशकता, आधुनिक विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन आणि अभिप्राय प्रणाली, शिक्षण आणि अध्यापनशास्त्रीय नवोपक्रम, मूलभूत विज्ञान, आरोग्य विज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली, व्यवस्थापन, व्यवसाय आणि उद्योजकता शिक्षण, समकालीन शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणालींचा समावेश तसेच अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि प्रायोगिक संशोधन या विषयांचा समावेश आहे. या परिषदेत स्पेन, मोरोक्को, जॉर्डन, चीन, भारत, अमेरिका, ट्युनिशिया, अल्जेरिया इ. देशातील विद्यार्थी आणि संशोधक सहभागी होत आहेत. परिषदेमध्ये संशोधनपर सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय पॅनेल चर्चासत्रे तसेच विविध शैक्षणिक सादरीकरणांचे आयोजन करण्यात येणार आहे. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जागतिक स्तरावरील सहकार्य आणि नव्या कल्पनांची देवाणघेवाण घडवून आणणे, हा या परिषदेचा उद्देश आहे.

# तक्रार होती, पुरावे होते... तरीही आरोपी मोकाट!

## वाळूज MIDC पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे कथित तलाठी भरती रॅकेटचा सूत्रधार फरार?

**हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** कथित बोगस तलाठी भरती रॅकेटमुळे सध्या जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली असताना या प्रकरणातील एक धक्कादायक बाब समोर आली आहे. भरतीच्या नावाखाली लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार आणि संबंधित पुरावे पोलिसांकडे उपलब्ध असतानाही वेळेत कारवाई झाली नसल्याचा आरोप होत असून, पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे या प्रकरणातील प्रमुख संशयिताला पसार होण्याची संधी मिळाल्याची चर्चा रंगली आहे.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिल्यानंतर अनेक धागेदोरे समोर येऊ लागले आहेत. त्यातच संशयित बबनराव देवकते हा रांजणगाव शेणपुंजी परिसरात अनेक महिने वास्तव्यास असल्याची माहिती पुढे आली आहे. विशेष म्हणजे, त्याच्याविरुद्ध फसवणुकीची तक्रार दाखल झाल्यानंतरही तो परिसरात वावरत असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारदार उद्धव नरवडे यांच्या म्हणण्यानुसार, देवकते याने मंत्रालयातील ओळखी आणि सरकारी भरती प्रक्रियेतील प्रभाव असल्याचे भासवत तलाठी भरतीत नियुक्ती मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. त्यातून दोन उमेदवारांकडून तब्बल २० लाख रुपये उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुरुवातीला आगाऊ रक्कम, नंतर नियुक्ती आदेशाच्या नावाखाली आणखी पैसे, अशा टप्प्याटप्प्याने ही रक्कम घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची निवड न झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पैसे परत मागण्यात आले. मात्र आश्वासने, सबबी आणि विलंब यापलीकडे काहीच घडले नाही, असा आरोप आहे. अखेर पोलिसांकडे धाव घेण्यात आली. मात्र तक्रार दाखल झाल्यानंतरही तपासाला अपेक्षित वेग मिळाला नाही, असा आरोप पीडितांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या संशयिताविरुद्ध राज्यातील विविध भागांत तत्सम स्वरूपाच्या तक्रारी आणि गुन्हे नोंद असल्याची माहिती समोर येत आहे. या दाव्यांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली तरी तपास यंत्रणांकडून त्याची पडताळणी सुरू असल्याचे सांगितले जाते. विशेष बाब म्हणजे, एका बेरोजगार युवकाने कथित पोस्टिंगबाबत चौकशी केल्यानंतर हे संपूर्ण प्रकरण नव्याने चर्चेत आले. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने स्वतः पुढाकार घेत तपासाला गती देण्याचा निर्णय घेतला. आता प्रश्न असा उपस्थित केला जात आहे की, जर सुरुवातीच्या तक्रारीवरच प्रभावी कारवाई झाली असती, तर आज हे प्रकरण एवढ्या मोठ्या स्वरूपात समोर आले असते का? या पार्श्वभूमीवर तपास केवळ कथित भरती रॅकेटपुरता मर्यादित न राहता, तक्रारीनंतर नेमकी कोणती कारवाई झाली, कोणती झाली नाही आणि विलंबासाठी जबाबदार कोण, याचाही शोध घेण्याची मागणी पुढे येत आहे. बेरोजगारांच्या स्वप्नांशी खेळ करणाऱ्यांसोबतच अशा प्रकरणांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची जबाबदारीही निश्चित होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सोने चांदीच्या दरात मोठी घसरण , ग्राहकांना दिलासा

**जळगाव :** गेल्या काही दिवसांपासून सोने चांदीच्या दरात चढउतार पहायला मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला कात्री लागल्याचं चित्र आहे. अशातच सोने,चांदी खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी एक मोठी आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून सतत वाढत असणारे सोने आणि चांदीचे भाव हे आज चांगलेच घसरले आहेत.

जळगावच्या सराफ बाजारात सोन्या आणि चांदीच्या दरात विक्रमी घसरण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. ज्यांना सोने खरेदी करण्याची इच्छा होती त्यांना खरेदी करण्याची संधी मिळाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढणाऱ्या सोने आणि चांदीच्या किमतींना आता ब्रेक लागला असून, मौल्यवान धातूंच्या दरात लक्षणीय घसरण नोंदवली गेली आहे.

# ई-केवायसी नसेल तर पीएम किसानचा हप्ता अडकणार!

## 30 जून अंतिम मुदत; लाभार्थी शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेणाऱ्या लाखो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. योजनेअंतर्गत लाभ मिळविणाऱ्या प्रत्येक लाभार्थ्याने ३० जून २०२६ पूर्वी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले असून, ही प्रक्रिया अपूर्ण राहिल्यास पुढील हप्ता मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कोणताही पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नये, यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी सहा हजार रुपयांची आर्थिक मदत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने दिली जाते. देशभरातील कोट्यवधी शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, लाभ केवळ पात्र आणि वास्तविक लाभार्थ्यांपर्यंतच पोहोचावा यासाठी शासनाने वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण अनिवार्य केले आहे.

सध्या राज्यासह मराठवाड्यातही ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. गावागावांमध्ये ग्रामस्तरीय नोडल अधिकारी (व्हीएनओ) तसेच कृषी विभागाचे क्षेत्रीय कर्मचारी लाभार्थ्यांशी संपर्क साधत असून, अपूर्ण असलेली ई-केवायसी तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करत आहेत. शेतकरी आपल्या जवळील सामाईक सेवा केंद्रात (सीएससी) जाऊन बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे ई-केवायसी करू शकतात. तसेच पीएम किसान मोबाईल ॲपवर उपलब्ध असलेल्या फेस ऑथेंटिकेशन सुविधेचाही वापर करता येणार आहे. या दोन्हीपैकी कोणतीही एक पद्धत वापरून प्रमाणीकरण पूर्ण करता येईल.

अनेक ग्रामीण भागांमध्ये तांत्रिक अडचणी किंवा मोबाईल वापरण्याबाबत मर्यादा असल्याने काही लाभार्थ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित आहे. अशा शेतकऱ्यांनी ग्रामस्तरीय नोडल अधिकारी किंवा संबंधित कृषी कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी, असे विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, ई-केवायसी न झाल्यास आगामी हप्त्याचे वितरण रोखले जाण्याची शक्यता असल्याने अंतिम मुदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. शासनाच्या या मोहिमेमुळे पात्र लाभार्थ्यांची नोंदणी अद्ययावत होण्यास मदत होणार असून, योजनेचा लाभ अधिक पारदर्शकपणे वितरित होणार आहे.

# जनतेच्या प्रश्नांसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन : प्रदीप जैस्वाल

## नव्या दमाने पक्ष संघटनेच्या कामाला लागण्याची पदाधिकाऱ्यांना सूचना



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसैनिक हा जनतेचा प्रतिनिधी म्हणून काम करत असतो. निवडणूकीपुरते राजकारण आणि इतरवेळा समाजकारण हा मंत्र जपला पाहिजे. आम्ही हार-जीत आणि जय-पराजय अनुभवला आहेत. त्यामुळे महानगरपालिका निवडणूकीत झालेल्या पराभवाने खचून जाऊ नका. नव्या दमाने पक्ष संघटना वाढीच्या कामाला लागण्याची सूचना शिवसेना आमदार प्रदीप जैस्वाल यांनी पदाधिकाऱ्यांना केली.

छत्रपती संभाजीनगर मध्य विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी आमदार प्रदीप जैस्वाल यांनी मार्गदर्शन केले.

लवकरच नवे पदाधिकारी यांची नेमणूक करून संघटना वाढीसाठी प्रयत्न करा. जे झालं ते झालं, यापुढे जनेतेमध्ये जाऊन पुन्हा मिसळून राहा. शिवसेना मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, युवानेते खासदार श्रीकांत शिंदे हे आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे आहेत. मागील निवडणूकीत प्रभागरचना, मतदारयाद्या आणि वेळेवर युती तुटणे अनेक कारणे पराभावाला कारणीभूत आहेत. जनतेने चांगला प्रतिसाद आणि आशीर्वाद आपल्याला दिला आहेत. मात्र मतांचे वर्गीकरण आणि आकडेवारी यामुळे थोडयाथोड्या मताने अनेकजण पराजित झाले. अनेकवॉर्डात जास्त मते मिळाली आहेत, मात्र पूर्वी वॉर्ड पद्धतीमुळे इतर वॉर्डात संपर्क करता आला नव्हता. एसआयआरची कामे चांगली करून मतदारयाद्या अपडेट करा. शाखाबांधणी आणि प्रभागप्रमुख लवकरच जाहीर करा, अशी सूचना आमदार जैस्वाल यांनी केली.

# मुख्यालयी निवास द्या; मगच राहण्याची सक्ती करा : शिक्षक संघटनांची मागणी

## शिक्षक संघटनांचा आक्रमक पवित्रा; आ. विक्रम काळे यांच्या मध्यस्थीने सीईओंना निवेदन

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**
**सिद्धेश्वर थोर**



**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षकांसाठी मुख्यालयी निवासस्थाने उपलब्ध करून दिल्याशिवाय मुख्यालयी राहण्याची सक्ती करू नये, अशी ठाम मागणी विविध शिक्षक संघटनांनी केली आहे. या मागणीसाठी बुधवारी (दि. १०) जिल्हा परिषद परिसरात शिक्षक संघटनांची संयुक्त बैठक झाली. आमदार विक्रम काळे यांच्या मध्यस्थीने शिक्षक प्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी. एम. यांना निवेदन सादर केले.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षकांना मुख्यालयी राहण्याबाबत दिलेल्या इशाऱ्यानंतर शिक्षकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर शिक्षक समन्वय समितीच्या पुढाकाराने ही बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत शासनाकडून मुख्यालयी निवासाची कोणतीही ठोस सुविधा उपलब्ध नसताना शिक्षकांवर राहण्याची सक्ती करणे अन्यायकारक असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. तसेच शिक्षकांसाठी मुख्यालयी निवासस्थाने उभारावीत, शंभर टक्के निधी उपलब्ध करून द्यावा, जिल्ह्यातील शाळांचे स्ट्रक्चर ऑडिट करून आवश्यक भौतिक सुविधा पुरवाव्यात, तसेच गणवेशासाठी अपुरा निधी देऊन मुख्याध्यापकांवर जबाबदारी टाकू नये, अशा विविध मागण्या मांडण्यात आल्या.

मागण्या मान्य न झाल्यास जिल्ह्यातील शिक्षक प्रभारी पदांचे कार्यभार सोडतील तसेच शासकीय व्हॉट्सअॅप गटांमधून बाहेर पडतील, असा इशाराही संघटनांनी दिला.

बैठकीस शिक्षक समन्वय समितीचे मुख्य समन्वयक विजय साळकर, डी. पी. जाधव, दीपक पवार, महेंद्र बारवाल, शिवराम मस्के, सचिन वाहक, शिवराज मोहिते, एम. एम. खुटे, नितीन पवार, देविदास सांगळे, दिलीप गोरे, नितीन नवले, रमेश जाधव, गोविंद उगले, भीमराव मुंडे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**चौकट :** प्रशासनाची भूमिका

सीईओ मिन्नु पी. एम. यांनी शासनाकडे मुख्यालयी निवासाबाबत प्रस्ताव पाठविण्याची सकारात्मक भूमिका घेतली आहे. तसेच संबंधित गावांमध्ये शासकीय निवास व्यवस्था उपलब्ध होऊ शकते का, याची पडताळणी केली जाणार आहे. तोपर्यंत मुख्यालयी वास्तव्यासंदर्भात कोणत्याही शिक्षकावर कारवाई केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्न करावेत तसेच शाळा वेळेच्या १५ मिनिटे आधी सुरू करून १५ मिनिटे अधिक काळ चालवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.

# राष्ट्रीय स्तरावरील संधीसाठी राज्यातील युवा हँडबॉलपटूंची संभाजीनगरात चुरस


## 12 ते 14 जून दरम्यान 15 वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धा

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य हँडबॉल असोसिएशनच्या मान्यतेने आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा हँडबॉल संघटनेच्या वतीने १२ ते १४ जून २०२६ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे १५ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील २५ हून अधिक संघांच्या सहभागामुळे या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून राज्यातील उदयोन्मुख हँडबॉलपटूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

राज्यातील हँडबॉल खेळाचा विकास, ग्रामीण व शहरी भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देणे तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम खेळाडू घडविणे या उद्देशाने या प्रतिष्ठित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धांमध्ये राज्यातील अव्वल युवा खेळाडू आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करणार असून वेग, चपळता, सांघिक समन्वय आणि जिद्दीचा उत्कृष्ट संगम क्रीडाप्रेमींना अनुभवता येणार आहे.

या स्पर्धांच्या यजमानपदाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. अतुल सावे यांनी स्वीकारली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेची जय्यत तयारी करण्यात येत आहे. राज्यातील हँडबॉल खेळाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या मा. सावे



यांच्या पुढाकारामुळे या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार, दि. १२ जून रोजी सायंकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून स्पर्धेदरम्यान साखळी, उपांत्यपूर्व, उपांत्य आणि अंतिम फेरीचे सामने खेळविण्यात येणार आहेत. अंतिम सामना व पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि. १४ जून रोजी संपन्न होणार आहे. विजेत्या व उपविजेत्या संघांसह उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक चषक, पदके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

राज्यभरातून येणाऱ्या खेळाडूंसाठी निवास, भोजन, वाहतूक, वैद्यकीय सुविधा, पंच व्यवस्था तसेच इतर आवश्यक सोयींची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेचे सुयोग्य नियोजन आणि व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार श्रीकांत जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे मुख्य समन्वयक अजिंक्य सावे, उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, सचिव डॉ. सत्यजित पगारे, प्रशिक्षक, स्वयंसेवक आणि क्रीडाप्रेमी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

या राज्यस्तरीय स्पर्धेच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर शहरात क्रीडामय वातावरण निर्माण होणार असून राज्यातील उदयोन्मुख हँडबॉलपटूंना आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटविण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. क्रीडाप्रेमी नागरिक, पालक, प्रशिक्षक, विद्यार्थी आणि हँडबॉलप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून युवा खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा हँडबॉल संघटनेच्या वतीने मनीष पाटील, डॉ. कालिदास तादलापूरकर, डॉ. मीनाक्षी मुलिया, रमेश सोनवणे, संजय सातदिवे, आशिष कान्हेड, डॉ. केजल भारसाखळे, डॉ. उज्वला सातदिवे, डॉ. रंजन बडवणे, संध्या झोपे, अविनाश दाभाडे आणि डॉ. सचिन पगारे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पूर्व वैमनस्यातून तरुणाची निर्घृण हत्या; ग्रामीण पोलिसांकडून दोघे ताब्यात





**परभणी :** जिंतूर महामार्गावरील धर्मपुरी परिसरात पूर्व वैमनस्यातून एका तरुणाची मध्यरात्री निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मित्रांनीच मित्राचा काठी आणि दगडाने ठेचून खून केल्याचे उघडकीस आले असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणातील दोन संशयित आरोपींना तातडीने ताब्यात घेतले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरतोडे, ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक जीवन राजगुरू आणि पोलीस उपनिरीक्षक पुंडलिक मोहिते यांनी तातडीने पथकासह आणि फॉरेन्सिक टीमसह घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. या कारवाईदरम्यान धर्मपुरीचे सरपंच तानाजी कदम, टाकळीचे पोलीस पाटील दत्ता राऊत आणि धर्मपुरीचे पोलीस पाटील परमेश्वर कदम उपस्थित होते. पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असून, हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ग्रामीण पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

अशोक भगवानराव मोरे असे मयत झालेल्या तरुणाचे नाव असून, त्याचा मृतदेह कुंभकरण टाकळी शिवारातील गोरक्षण म्हणजेच गायरान जमिनीच्या निर्मनुष्य भागात आढळून आला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास अशोक मोरे आणि त्याचे साथीदार कुंभकरण टाकळी शिवारातील पोतदार शाळेच्या पाठीमागे असलेल्या शेतात दारू पिण्यासाठी बसले होते. दारू पिल्यानंतर त्यांच्यात जुन्या वादावरून जोरदार भांडण सुरू झाले.

# घाटी रुग्णालयातील मध्यवर्ती ग्रंथालयात वैद्यकीय पुस्तकांचे प्रदर्शन



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील मध्यवर्ती ग्रंथालयात वैद्यकीय पुस्तकांचे आकर्षक प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, लिपिक मुराद बेग, लिपिक सुहास शेटे तसेच ग्रंथालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनानंतर अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी उपस्थितांना संबोधित करताना विद्यार्थ्यांनी, अध्यापकांनी तसेच सर्व संबंधितांनी या पुस्तक प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी आणि उपलब्ध वैद्यकीय ग्रंथसंपदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# जिल्हा रुग्णालयात डॉ. भालचंद्र स्मृती दृष्टी दिन सप्ताहाचे उत्साहात उद्घाटन

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. भालचंद्र स्मृती दृष्टी दिन सप्ताहाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. डॉ. कमलाकर मुदखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पद्मजा सराफ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. सराफ यांनी डोळ्यांचे आरोग्य हे प्रत्येकाच्या जीवनातील अमूल्य भांडार असल्याचे सांगत नियमित नेत्रतपासणी, संतुलित आहार व निरोगी जीवनशैली यांचे महत्त्व अधोरेखित केले. अंधत्व प्रतिबंध आणि नेत्रदानाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

दृष्टी दिन सप्ताहानिमित्त विविध जनजागृती उपक्रम, नेत्रतपासणी शिबिरे, आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच नेत्रदानाविषयी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नागरिकांनी डोळ्यांच्या आरोग्याबाबत सजग राहून नियमित तपासणी करून घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले. या प्रसंगी नेत्र शल्य चिकित्सक डॉ. आमेर कादरी, डॉ. स्नेहल सूर्यवंशी, नेत्र चिकित्सा अधिकारी पी. पी. पारवे तसेच सुवर्णा राजहंस, मार्टिना भालतिलक, कविता चव्हाण, अर्चना बागडे, सुनिता म्हस्के, अमोल साळवे, वैशाली पाटील, साकिब खान, दत्तात्रय बढे, आसिया शेख, भारती काथार, शिलाबाई तुपे, शंकर मामा आदी उपस्थित होते.

कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दृष्टी संवर्धन आणि अंधत्व निर्मूलनासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# शिक्षणाच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारा : डॉ. भानुसे

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** भाजप आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षकांविषयी केलेल्या वक्तव्यावर मराठा सेवा संघाचे मुख्य प्रवक्ते डॉ. शिवानंद भानुसे यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. शिक्षकांना लक्ष्य करण्याऐवजी भाजप सरकारच्या शिक्षणविषयक धोरणांवर भूमिका स्पष्ट करावी, असे त्यांनी म्हटले आहे. याबाबत काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात डॉ. भानुसे म्हणाले की, केंद्र व राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे सरकार असताना शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रश्न गंभीर बनले आहेत. सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद पडत आहेत, शिक्षणाचे बाजारीकरण वाढत आहे आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. या प्रश्नांवर आमदार बंब यांनी सरकारकडे पाठपुरावा करावा. सरकारी अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्या मुलांना सरकारी किंवा अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणे बंधनकारक केल्यास शाळांचा दर्जा आपोआप उंचावेल, असा दावा त्यांनी केला. तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरावरील परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटीच्या घटना आणि शिक्षण क्षेत्रातील अनागोंदीबाबतही सरकारला जाब विचारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षकांवर सातत्याने टीका करून मूळ प्रश्नांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करू नये, असा इशाराही डॉ. भानुसे यांनी दिला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911